महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२- २२०२ ५६०७ Email - tcacul१.mc-mh@gov.in

---

**क्रमांक : गोचिन-२०२४/प्र.क्र.६१/सां.का.१** **दिनांक : ३१ जुलै, २०२४**

**प्रति,**

सह / उप सचिव (आस्थापना)
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२

**विषय :** महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई या कार्यालयात सहव्यवस्थापकीय संचालक हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत

**संदर्भ :** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन-१२, दिनांक १७.१२.२०१६
२) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, गोरेगाव, मुंबई यांचे दि. २२ जुलै, २०२४ रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

राज्य शासनाच्या विविध विभागात विभागाच्या अधिपत्याखालील मंडळे / महामंडळातील पदांवर संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्यांबाबतचे नवीन धोरण सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ अन्वये जाहीर केलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई या कार्यालयात खालील पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहे :-

| अ. क्र. | पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | ज्या संवर्गातून पद भरावयाचे आहे त्या संवर्गाची नांवे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सहव्यवस्थापकीय संचालक | महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई | S-२५ : ७८८०० - २०९२०० | मंत्रालयीन विभागातील उप सचिव/ सह सचिव / महसूल संवर्गातील अपर जिल्हाधिकारी / समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी |

०२. तरी, सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पदांवर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची नावे त्यांच्या मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालांसह, वैयक्तिक माहिती व ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र इ. माहिती संदर्भाधीन शासन निर्णय

दि.१७.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे याबाबतची माहिती सोबतच्या विहित करण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये या विभागाकडे **जहिरात प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत** ई-मेलद्वारे/ प्रत्यक्षपणे निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने कृपया पाठवावीत. इच्छूक अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास त्यांना संबंधित विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे याबाबतही कृपया अभिप्राय द्यावेत. आपल्या विभागातून प्रतिनियुक्तीसाठी कोणीही अधिकारी इच्छूक नसल्यास, निरंक असेही कृपया कळविण्यात यावे. एकदा निवड झालेल्या अधिका-याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही. तसेच, सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पत्र त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

( अ.सु. देशपांडे )
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

सोबत - वरीलप्रमाणे

**प्रत:**

१. निवडनस्ती (सां.का.१)

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई या कार्यालयात सहव्यवस्थापकीय संचालक हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यासंदर्भात इच्छूकता मागविण्यासाठी विहित करण्यात आलेला नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अधिकाऱ्याचे संपूर्ण नांव | |
| २ | पदनाम/ संवर्ग<br>पदाची वेतनश्रेणी | |
| ३ | सध्याच्या कार्यालयाचे नांव व पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ४ | जन्म दिनांक | |
| ५ | शैक्षणिक अर्हता | |
| ६ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ७ | ज्या पदावर प्रतिनियुक्तीवर जाण्यास इच्छूक आहे ते पद | |
| ८ | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत) | |
| ९ | संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे? तसेच, त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार / लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे, | |
| १० | संबंधित अधिकाऱ्याची निवड झाल्यास त्यास तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल किंवा कसे- | |
| ११ | संबंधित अधिकारी कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १०% पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत किंवा कसे, | |
| १२ | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१२.२०१६ व दि.१६.०२.२०१८ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे, | |